जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

28 APR 2016

# 'एनएसएसमुळेच समाजविकासाचा विचार'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'विद्यार्थ्यांमध्ये समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) मोठे योगदान असून केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना व उपक्रमाच्या अंमलबजावणीत एनएसएसने अधिक सक्रिय योगदान द्यावे', असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या एनएसएसतर्फे २०१५-१६ मधील विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण आणि सन २०१६-१७ चे कार्यनियोजन बैठक असा संयुक्त कार्यक्रम बुधवारी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी 'विद्यार्थ्यांच्या श्रमशक्तीच्या बळावर या जगात अशक्य काही नाही, याची प्रचिती एनएसएसच्या उपक्रमातून येत आहे' असे गौरवोद्गार काढले. यावेळी केआयटी महाविद्यालयाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ एनएसएस संकेतस्थळाचे उद्घाटन व संकेतस्थळ निर्माण करणाऱ्या टीमचा सत्कार झाला. विद्यापीठस्तरीय, जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, कोल्हापूर एनएसएसचे जिल्हा समन्वयक डॉ. डी. डी. चिपळोणकर, सांगली जिल्हा समन्वयक डॉ. राजेंद्र मोरे, सातारा जिल्हा समन्वयक डॉ. एस. एन. जाधव उपस्थित होते. कार्यक्रम समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले.



एनएसएसचा पुरस्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंगचे प्रा. प्रमोद डी. चौगुले. शेजारी बीसीयूडी डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

## पुरस्कार असे

**जिल्हास्तरीय महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी -** प्रा. प्रमोद चौगुले (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग), प्रा. सुरेश चव्हाण (कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज), प्रा. अनिलकुमार चव्हाण (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर).

**विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी -** डॉ. स्नेहल राजहंस (कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु.), डॉ. संगीता पाटील (कला, वाणिज्य महाविद्यालय, पलूस) डॉ. तानाजी हवालदार (नाईक महाविद्यालय, कोकरूड).

**जिल्हास्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक -** अजित पोवार (इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ), आकाश पाटील (शहाजी छत्रपती महाविद्यालय).

**विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक -** शुभम मोरे (डी. डी. शिंदे सरकार कॉलेज) व सोनिया गनेखान शानेदिवाण (विवेकानंद महाविद्यालय), पुष्पा सुतार (महावीर महाविद्यालय), करण लोकपाळ (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत 28 APR 2016

# समाज जागृतीसाठी योगदान द्या : शिंदे

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुरस्कारांचे वितरण : संकेतस्थळाचेही शानदार अनावरण

**कोल्हापूर :** छोट्या-छोट्या गोष्टींतून देशसेवा शक्य आहे. ते राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) उपक्रमांतून सिद्ध झाले आहे. या उपक्रमांकडे सकारात्मकपणे पाहण्याचा दृष्टिकोन समाजात रुजविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने समाज जागृती व प्रबोधनासाठी एनएसएसच्या कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक यांनी योगदान द्यावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'राष्ट्रीय सेवा योजने'तर्फे सन २०१५-१६ मधील विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरणावेळी ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमास बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध उपक्रमांबाबत समाजात जागृती करणे, त्यांना हा उपक्रम राबविण्यासाठी प्रेरित करणे अशी कामे एनएसएसच्या माध्यमातून अधिक उत्तम प्रकारे करता येतील. त्यासाठी शिक्षक, विद्यार्थी यांनी एनएसएसच्या माध्यमातून काम करावे. डॉ. मोरे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या श्रमशक्तीच्या बळावर या जगात अशक्य असे काही नाही, याची प्रचिती एनएसएसच्या उपक्रमांतून येते. कार्यक्रमात केआयटी कॉलेजने बनविलेल्या विद्यापीठाच्या एनएसएस संकेतस्थळाचे डॉ. शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. संकेतस्थळाची निर्मिती करणाऱ्या संघाचा सत्कार करण्यात आला. यानंतर विद्यापीठस्तरीय, कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट एनएसएस महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक, स्वयंसेविका यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्मृतिचिन्ह, ग्रंथभेट असे पुरस्काराचे स्वरुप होते. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, 'एनएसएस'चे जिल्हा समन्वयक डॉ. डी. जी. चिघळीकर, सदाशिव मोरे, एस. एन. जाधव, आदी उपस्थित होते. डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सुरेश शिखरे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

### पुरस्कारांचे मानकरी असे -

कार्यक्रम अधिकारी : कोल्हापूर जिल्हा : प्रा. प्रमोद चौगुले (डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी), सुरेश चव्हाण (कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज), अनिलकुमार चव्हाण (यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी), ज्ञानदेव यादव (दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स् अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी). सातारा : यु. एल. देशपांडे (शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कऱ्हाड), सुरेश साळुंखे (सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालय, कऱ्हाड). सांगली : अनिल सत्रे (मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव), केदारनाथ जगदाळे (आदर्श इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, विटा). विद्यापीठस्तरीय कार्यक्रम अधिकारी : डॉ. स्नेहल राजहंस (कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक), संगीता पाटील (कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस), तानाजी हवालदार (बाबा नाईक महाविद्यालय, कोकरुड). उत्कृष्ट स्वयंसेवक : कोल्हापूर : अजित पोवार (राज्य अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ), आकाश पाटील (शहाजी कॉलेज). विद्यापीठस्तरीय : संग्राम मोरे (डी. डी. शिंदे सरकार कॉलेज), सोनिया शानेदिवाण (विवेकानंद महाविद्यालय), पूनम सुतार (महावीर महाविद्यालय), करण संकपाळ (कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पलूस)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

28 APR 2016

# 'धर्माचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास व्हावा'

## देवानंद शिंदे : मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्घाटन

कोल्हापूर : एकविसाव्या शतकात धर्माबद्दल संशोधन करीत असताना वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यास अशी साहित्य संशोधन केंद्रे उपयुक्त ठरतील, असा आशावाद शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

मुस्लिम बोर्डिंग हाऊसतर्फे बुधवारी सुरु करण्यात आलेल्या मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खासदार संजय काकडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमंत मालोजीराजे छत्रपती उपस्थित होते. यावेळी मुस्लिम बोर्डिंगचे कार्यकारिणी सदस्य आदिल फरास, कादर मलबारी, अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव मुळीक, माजी आमदार पाशा पटेल, आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरु शिंदे म्हणाले, 'उर्दू व मराठी या भाषेतील फरकामुळे सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रात मुस्लिम व अन्य समाजात दरी निर्माण झाली. समाजातील अशा विविध प्रश्नांवर उत्तर शोधण्यासाठी तसेच मुस्लिम समाजातील लेखकांसाठी व्यासपीठ हे संशोधन केंद्र महत्त्वाची भूमिका बजावेल. यामुळे समाजिक आयाम नव्याने जोडले जातील. कुराणातील विज्ञान नव्या परिभाषेत मांडण्यासाठी तसेच भाषेचे बंधन तोडून दर्जेदार साहित्य निर्मितीसाठी असे केंद्र उपयोगी ठरेल.

नसीर अत्तार



कोल्हापुरातील मुस्लिम बोर्डिंग हाऊसतर्फे बुधवारी मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्घाटन डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून प्रा. डॉ. राजेखान शाणेदिवाण, श्रीमंत छत्रपती मालोजीराजे, खासदार संजय काकडे, अध्यक्ष गणी आजरेकर, आदिल फरास, आदी उपस्थित होते

मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्रातून दर्जेदार साहित्याची निर्मिती झाल्यास ते शिवाजी विद्यापीठाकडून प्रकाशित करु, अशी ग्वाही कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी बुधवारी दिली.

श्रीमंत छत्रपती मालोजीराजे म्हणाले, मुस्लिम समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व दिशा देण्यासाठी अशा संशोधन केंद्राची भूमिका महत्त्वाची असेल.

खासदार काकडे म्हणाले, केंद्रातील सर्व महत्त्वाच्या पुस्तकांचे स्कॅनिंग करुन ते संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिल्यास देशभरातील संशोधकांसाठी उपयोगी पडतील.

केंद्र समन्वयक प्रा. डॉ. राजेखान शाणेदिवाण यांनी प्रास्ताविक केले. मुस्लिम बोर्डिंग हाऊचे चेअरमन गणी आजरेकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

पुण्यनगरी

28 APR 2016

# विज्ञानवादी दृष्टिकोनातून धर्मांचे मूल्यमापन करा

## डॉ.देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : मुस्लिम बोर्डिंग येथे मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्घाटन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, राज्यसभा सचिव संजय काकडे, श्रीमंत मालोजीराजे यांच्यासह मान्यवर.

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** प्रत्येक धर्मांचे मूल्यमापन जर वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून केले तर त्यातील रूढी परंपरा नाहीशा होऊन माणुसकीचा धर्म निर्माण होईल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यानी केले.

मुस्लिम बोर्डिग येथे मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्घाटन डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या उद्घाटन प्रसंगी राज्यसभा सदस्य संजय काकडे, श्रीमंत मालोजीराजे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शिंदे म्हणाले, मी आयुष्यात प्रथमच एखाद्या कार्यक्रमाला एवढ्या मोठ्या प्रमाणात मुस्लिम महिलांची उपस्थिती पाहिली आहे. याचे सगळे श्रेय राजर्षी शाहू महाराज यांना जाते. आपल्यात का भेदभाव निर्माण झाला, याचा विचार केला असता लक्षात येते की, आपण दुसऱ्याला मध्ये घुसू दिले आणि त्याने हेतूपूर्वक आपल्यात संघर्ष निर्माण केला.

आजवरचा इतिहास आपण पाहिला तर लक्षात येते की मुस्लिम लेखकांनी जास्त मराठी साहित्य निर्माण केलेले नाही. याच्या कारणांचा शोध घेतला असता समजते की, त्यांना भाषेची मोठी अडचण निर्माण झाली असावी. ज्यामुळे आजवर या दोन संस्कृती साहित्याच्या, वैचारिकतेच्या पातळीवर एकत्र येऊ शकल्या नाहीत. पण संत साहित्यात डॉ. यु. म. पठाण यांचा इतका श्रेष्ठ साहित्यिक झाला नाही, याचाही आपणास विसर पडता कामा नये. मुस्लिम समाजातुन या चळवळीचया माध्यमातुन जर दर्जेदार साहित्य निर्माण झाले तर मी विद्यापीठाकडून त्याचे प्रकाशन करीन, असा विश्वास त्यांनी यावेळी दिला.

मालोजीराजे म्हणाले, मुस्लिम समाज अजूनही म्हणावा इतका शिक्षण क्षेत्रात अग्रेसर नाही. पण त्याने पुढे येण्यासाठी शिक्षणाची कास सोडता कामा नये. आज जो महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतला आहेतो या समाजाच्या दृष्टीने क्रांती आहे. अणि खऱ्याअर्थाने शाहूंना अभिवादन आहे. हे संशोधन केंद्र मुस्लिम समाजातील नव्या पिढीला निश्चित मार्गदर्शक ठरेल, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. संजय काकडे म्हणाले, या संशोधन केंद्रात जी पुस्तके असतील ती सगळी स्कॅनिंग करुन नवीन वेबसाइट तयार करून त्यावर टाका. याला जो खर्च येइल तो मी देईन. मुस्लिम बोर्डाचा अध्यक्ष मराठा तर उपाध्यक्ष मुस्लिम आहे. तरीही हा एकोपा शंभर वर्षे टिकला आहे. हा आदर्शवत संदेश महाराष्ट्रभर पोहोचायला हवा.

आदिल फरास, गणी आजरेकर, वसंतराव मुळीक, पाशा पटेल, डॉ. रणधिर शिंदे, डॉ. विनोद कांबळे, भगवानराव काटे, कादर मलबारी, साहित्यिक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक व स्वागत डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

28 APR 2016

# विज्ञानवादी दृष्टीकोनातून व्हावा धर्माचा अभ्यास

## कुलगुरू डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन : मुस्लीम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्घाटन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विज्ञानवादी दृष्टीकोनातून धर्माचा अभ्यास केल्यास धर्मसुद्धा नव्याने मांडता येईल, या भुमिकेतून मुस्लीम मराठी साहित्य संशोधन केंद्राने भविष्यात वाटचाल करावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

दसरा चौकातील मुस्लीम बोर्डिंगमध्ये मुस्लीम मराठी साहित्य संशोधन केंद्र सुरू झाले आहे. या केंद्राचे उद्घाटन बुधवारी कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी खासदार संजय काकडे होते. यावेळी माजी आमदार मालोजीराजे छत्रपती, पाशा पटेल, संस्थेचे गणी आजरेकर, कादरभाई मलबारी, आदील फरास, आय. जी. शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर :मुस्लीम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत संजय काकडे, मालोजीराजे छत्रपती, आदील फरास, गणी आजरेकर, कादरभाई मलबारी, शानेखान दिवाण, वसंतराव मुळीक, भगवान काटे आदी.

- मराठी व उर्दु भाषेतील दरी होईल कमी
- केंद्रातून येणारे साहित्य विद्यापीठ प्रकाशित करेल

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मुस्लीम मराठी साहित्य संशोधन केंद्रामुळे मराठी आणि उर्दू भाषेतील दरी कमी होणार आहे. त्यासाठी या केंद्राला स्वतःचे व्यासपीठ उभारावे लागेल, या केंद्राच्या माध्यमातून भविष्यात विज्ञानवादी दृष्टीकोनातून धर्माचा केला जाणारा अभ्यास या समाजासाठी उपयुक्त ठरेल, तसेच या केंद्रातून पुढे येणारे दर्जेदार साहित्य विद्यापीठ प्रकाशित करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

खासदार काकडे म्हणाले, मुस्लिम समाजात शैक्षणिक चळवळ खालच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजे. या समाजाने स्वतःच्या हक्कासाठी संघर्ष केल्यास नक्कीच त्यांना ते मिळतील. या केंद्राकडून पुस्तके ऑनलाईन झाल्यास त्यासाठी आपण सर्वतोपरी मदत करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

माजी आमदार मालोजीराजे म्हणाले, मुस्लीम समाजाच्या पालकत्वाची जबाबदारी शाहू घराण्यावर आहे. या समाजाला शैक्षणिक क्षेत्रात झुकते माप मिळाले पाहिजे. मुस्लीम बोर्डिंगने मुस्लीम मराठी साहित्य संशोधन केंद्र सुरू करून राज्य, देशासमोर आदर्श घालून दिला आहे. आपला इतिहास समजण्यासाठी तरूण पिढीने वाचन संस्कृती जोपासावी, त्यातूनच भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याची शक्ती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कादरभाई मलबारी, आय. जी. शेख यांनी स्वागत केले.

प्रा. राजेखान शानेदिवाण यांनी प्रास्ताविक केले. ताज मुलाणी यांनी सुत्रसंचालन केले. गणी आजरेकर यांनी आभार मानले. यावेळी निवास साळोखे, प्रा. आशा अपराध, आर. के. पोवार, दीपा पाटील, जयंत पाटील, रणधीर शिंदे, डॉ. रफीक सुरज, बाबासाहेब आत्तार, बापुसो मुल्ला, बोर्डिंगचे पदाधिकारी, संशोधन केंद्राचे पदाधिकारी, नेहरू हायस्कूलमधील शिक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

28 APR 2016

# धर्मात विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवल्यास समाजात एकोपा : कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सर्व धर्मांचा पाया विज्ञान असतो. हा विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवला, तर समाजात एकोपा निर्माण होतो. धर्मातील विज्ञानवादी गोष्टी समाजासमोर आणण्याचे काम मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्र करेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

मुस्लिम बोर्डिंगमध्ये सुरू करण्यात आलेल्या मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खा. संजय काकडे होते. माजी आमदार पाशा पटेल, मालोजीराजे छत्रपती, गणी आजरेकर, आदिल फरास, वसंतराव मुळीक, भगवान काटे, निवासराव साळोखे, कादर मलबारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मुस्लिमांविषयी जगभर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे काम या संशोधन केंद्राच्या माध्यमातून होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

खा. काकडे यांनी शाहू महाराजांनी सुरू केलेले कार्य शंभर वर्षांनंतरही अव्याहतपणे सुरू आहे. समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन काही स्वार्थी लोकांमुळे दूषित झाला आहे. चळवळीच्या माध्यमातून हक्क आणि अधिकार मिळवायला हवा. त्यासाठी तळागाळापर्यंत जाऊन चळवळ करून समाजाची प्रगती साधा, असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी केले. यावेळी मान्यवरांना सत्कार म्हणून कुराणच्या प्रती भेट देण्यात आल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

28 APR 2016

# इस्लाममधील विज्ञानवादी विचार सर्वांसमोर आणा

## डॉ. देवानंद शिंदे : मुस्लिम बोर्डिंगमध्ये मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. २७ : जगात धर्म कोणताही असो, त्याचा पाया विज्ञान आहे. मुस्लिम धर्मातील विज्ञानवादी विचार मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्रांतून सर्वांसमोर आणा. दर्जेदार साहित्याचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठ करेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.

दसरा चौकातील मुस्लिम बोर्डिंग मध्ये मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खासदार संजय काकडे होते. माजी आमदार मालोजीराजे प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू शिंदे म्हणाले, ''धर्मांमध्ये प्रश्नचिन्ह करणाऱ्यांची उत्तरे शोधण्याचे काम या संशोधनातून झाले पाहिजे. मराठी आणि मुस्लीम साहित्याला प्रगल्भ होता आले नाही, असे प्रास्ताविकात प्रा. राजेखान शानेदिवाण यांनी सांगितले; मात्र प्रत्यक्षात भाषेच्या अडचणीमुळे असे झाले असेल. व्यासपीठ मिळत नाही, असे म्हणण्यापेक्षा कधी कधी व्यासपीठ निर्माण केले पाहिजे.''





कोल्हापूर : मुस्लिम बोर्डिंगच्या वतीने बुधवारी मुस्लिम मराठी साहित्य संशोधन केंद्राचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी खासदार संजय काकडे, माजी आमदार मालोजीराजे, गणी आजरेकर, आदिल फरास.

मालोजीराजे म्हणाले, ''केंद्र उभारणीसाठी प्रा. शानेदिवाण यांचे अभिनंदन केले पाहिजे. शंभर वर्षांपूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी सर्व जाती-धर्मांना बोर्डिंग दिले; पण मुस्लिम बोर्डिंगचे अध्यक्षपद आपल्याकडे ठेवले. त्यांच्या विचारसरणीतूनच आज मुस्लिम मराठा साहित्य संशोधन केंद्राची उभारणी झाली हेच त्यांना अभिवादन आहे.''

खासदार संजय काकडे यांनी अध्यक्षीय भाषणात केंद्रातील सर्व साडेपाचशे पुस्तकांची ई-लायब्ररी करा, सर्व पुस्तके इंटरनेटवर उपलब्ध करा. यासाठी आवश्यक खर्च मी माझ्या व्यवसायातून देईन. पुण्यात केंद्रासाठी, विद्यापाठासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे पत्र मी दिले आहे. शासनाने जागा दिली नाही, तरी मी माझ्या मालकीची जागा देतो, असेही काकडे यांनी आश्वासन दिले.

पाशा पटेल, गणी आजरेकर, आदिल फरास, कादर मलबारी, वसंत मुळीक, निवास साळोखे, भगवान काटे, प्रा.डॉ. रफिक सुरज, बाबामोहम्मद आत्तार उपस्थित होते.



[illegible]

थेट संवाद

# भावनिक ऐक्य जपण्याचे महाराष्ट्रासमोर मोठे आव्हान



## प्रकाश पवार : स्वतंत्र विदर्भाची शक्यता कमी

**महाराष्ट्र दिन रविवारी (दि. १ मे) साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची वाटचाल, आव्हाने, संधी आणि स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा आदींबाबत राजकीय अभ्यासक व शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रकाश पवार यांच्याशी साधलेला हा थेट संवाद.**

**प्रश्न** : महाराष्ट्राच्या वाटचालीबाबत काय सांगाल?

**उत्तर** : संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सहभागी झालेल्या लोकांना असे वाटले होते की, महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्यात भावनिक ऐक्य निर्माण होईल. मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र हे एकजीव होतील. त्यासाठी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत मोठे योगदान असलेल्या माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी प्रयत्न केले. काळाच्या ओघात भावनिक ऐक्य नीट झाले नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण हे प्रत्येक विभाग एकमेकांचे स्पर्धक म्हणून पुढे आले. या विभागात महाराष्ट्रीयन समाजाऐवजी 'प्रादेशिक समाज' अशी संकल्पना घडली. त्यामुळे येथे लोकांची ओळख प्रदेशवाचक स्वरुपात व्यक्त होते. विभागनिहाय ओळख मुजली नाही, ती अधिक तीव्र झाली. त्यामुळे अधोगतीच्या दिशेने आपली पावले पडली. प्रगती म्हणजे विकास नव्हे, तर आपली उत्क्रांती आहे. त्यानुसार पाहता महाराष्ट्राच्या वाटचालीतील उत्क्रांतीचा आलेख खाली आहे.

**प्रश्न** : विकासाबाबत राज्याची स्थिती कशी आहे?

**उत्तर** : महाराष्ट्रात पहिल्यापासून औद्योगिक विकास होत गेला आहे. राज्याचा विकास हा मुंबई केंद्रित झाला आहे. मुंबई-ठाणे, रायगड-नाशिक आणि पुणे असा विकासाचा त्रिकोण राहिला आहे. उर्वरित महाराष्ट्राचा फारसा औद्योगिक विकास झालेला नाही. विकासाबाबत हा प्रांत मागास झाला आहे. सेवा-व्यवसायाचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला आहे. त्यातील व्यापारी वृत्तीचा विकास झाला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रीयन लोकांपेक्षा अमराठी लोकांचा जास्त पुढाकार आहे. शेतीबद्दल महाराष्ट्राची सन १९६०-७० दरम्यान प्रगती झाली. पुढे हरितक्रांती, धवलक्रांती अशा विविध क्रांती झाल्याच्या कल्पना केल्या जातात. मात्र, प्रत्यक्षात राज्यातील शेतीचा विकास झालेला नाही. याचे पहिले कारण म्हणजे राज्यात उपलब्ध असलेले कमी पाणी, दुसरे म्हणजे प्रत्येक जिल्ह्यातील अर्धा भाग अवर्षण प्रवण आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्हा हा शेतीबाबत अर्धा मागास आहे. हे चित्र पश्चिम महाराष्ट्राचे आहे. विदर्भ, मराठवाड्यातील स्थिती यापेक्षा तीव्र आहे. त्यामुळे जायकवाडी, उजनी धरणांचे पाणी मराठवाड्याला हवे आहे. 'मराठवाडा विरुद्ध उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र' असा प्रश्न उभा राहिलेला आहे. विकासाबाबत राज्याचे चित्र फारसे समाधानकारक नाही.

**प्रश्न** : साहित्य-संस्कृती, कामगार चळवळीचे स्थिती कशी आहे?

**उत्तर** : राज्यात औद्योगिकरण, खासगीकरणानंतर कामगार चळवळीचा ऱ्हास झाला. कामगार चळवळ सध्या असंघटित स्वरुपात आहे. कामगार हे डाव्या विचारांकडून उजव्या विचारांकडे वळले आहेत. त्यामुळे चळवळीच्यामार्फत समस्या सोडविणे आणि विकास साधणे यात पुढाकार घेत नाही, असे राज्याचे चित्र झाले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेवेळी राजकारणी लोक हे राजकारणकर्मी व साहित्यकर्मी होते. त्याचे उदाहरण म्हणजे लेखक व राजकीय नेते असलेले माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे आहेत. राज्याच्या स्थापनेनंतर राजकारणकर्मी व साहित्यकर्मी ही नावे वेगवेगळे होत गेली. सध्या साहित्यिक लोक आणि राजकारणी यांच्यात छत्तीसचा आकडा असल्याचे दिसून येते. त्यामुळे राज्यातील साहित्य व संस्कृतीचा दबदबा कमी झाला आहे. महाराष्ट्रात आत्मचिकित्सा करणे, त्याबद्दल आदर ठेवणे हे लोकांच्या अंगवळणी पडले होते तसा समाज घडला होता. आता असे दिसते की, तुम्ही कोणाचीही चिकित्सा करु शकत नाही. स्वतंत्रपणे मत मांडू शकत नाही. मांडल्यास त्याचे परिणाम तेवढेच तीक्ष्ण असतात. हा राज्याच्या साहित्य-संस्कृती मनात झालेला बदल आहे.

**प्रश्न** : राज्यासमोरील आव्हाने आणि संधी कोणत्या आहेत?

**उत्तर** : मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यात भावनिक ऐक्य निर्माण करणे हे आपल्या राज्यासमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. त्यासह साधन संपत्तीच्या वितरणामध्ये समानता आणणे. कारण, समन्यायी पाणी वाटप हा राज्यातील यक्षप्रश्न आहे. अर्थसंकल्पात समन्यायी निधीचे वाटप महत्त्वाचे आहे. कायद्याचे राज्य आवश्यक आहे. कारण, राज्यात आता कायदा मोडणे हे अंगवळणी पडले आहे. त्याबद्दल कोणालाच भीती वाटत नाही. त्यामुळे असे जे लोक आहेत, त्यांच्यामध्ये एका अर्थाने स्वैराचाराचे वर्तन वाढले आहे. या वर्तनाचा परिणाम अर्थकारणाशी संबंधित आला आहे. त्यात भ्रष्टाचार, वाळूमाफीया, कोणत्याही गोष्टीला कितीही शुल्क आकारणे आदींचा समावेश होतो. नोकरशाहीदेखील पांढरा हत्ती पोसल्यासारखी आहे. त्यातून कायद्याचे राज्य दुबळे झाले असून त्याच्या सक्षमीकरणाचे आव्हान राज्यासमोर आहे. कोकण किनारा, बंधाऱ्यांच्या विकासाची राज्याला मोठी संधी आहे. मात्र, यासाठी संरचनात्मक विकासावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो, त्यातील पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविला पाहिजे. मुंबई ही राज्याच्या विकासासाठी देणगी आहे. या मुंबईचे स्वरुप बहुभाषिक, सांस्कृतिक आहे ते जपले पाहिजे. महाराष्ट्र एकूण बहुल आहे. त्याचे बहुलपण हे एक आश्चर्य असून, त्याच्याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

**प्रश्न** : स्वतंत्र विदर्भाच्या मुद्द्याबाबत काय सांगाल?

**उत्तर** : स्वतंत्र विदर्भ राज्याची स्थापना व्हावयाची असल्यास संघटन होणे आवश्यक आहे. स्वतंत्र विदर्भ चळवळीला लोकांचा संघटनात्मक पाठिंबा नाही, तसेच विदर्भ ही कल्पनादेखील स्वतंत्र विदर्भाच्या मुद्द्यावर दोन गटांत विभागली जात आहे. त्यात पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ असा फरक पडतो तसेच शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षांचा स्वतंत्र विदर्भाला विरोध होतो. त्यामुळे मागणी ही एकसंध नाही, शिवाय यात दोन गट आहेत. त्यामुळे भाजप सत्तेत असतानाच स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती होईल याची शक्यता कमी आहे. भाजप, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांचा स्वतंत्र विदर्भाच्या स्थापनेस पाठिंबा आहे. मात्र, हा पाठिंबा या पक्षांना पश्चिम विदर्भात धोकादायक ठरणार आहे. त्याचे आत्मभान सर्वच पक्षांना आहे. त्यामुळे श्रीहरी अणे यांनी आंदोलन उभे केले असले तरी, भाजप सरकारकडून त्यांच्या सत्तेच्या अखेरच्या दोन वर्षांत विदर्भ राज्याच्या स्थापनेचा विचार केला जाणार नाही.

- संतोष मिठारी

# लोकशाही प्रगल्भ करण्यात मतदारांचा वाटा

## प्रा. परिमल सुधाकर : विद्यापीठात श्रीमती शारदाबाई पवार अध्यासनातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २७ : भारतीय निवडणूक प्रक्रियेत मतदार सातत्याने कळीची भूमिका बजावतात. त्यांच्या जागरूकतेमुळेच निवडणुकांचा कौल दरवेळी वेगळा असला तरी लोकशाही प्रगल्भ बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन प्रा. परिमल माया सुधाकर यांनी येथे केले.

एम.आय.टी. पुणे, शिवाजी विद्यापीठाचा राज्यशास्त्र अधिविभाग तसेच श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतातील सद्य:राजकीय परिस्थिती आणि उदयोन्मुख संधी' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत ते बोलत होते.

'भारतातील निवडणूक, राजकारणाचे बदलते स्वरूप' या विषयावर बोलताना प्रा. परिमल म्हणाले, 'भारतातील निवडणुकांमध्ये सातत्य, स्थिरता नसून ती सातत्याने मतदाराच्या कौलावर अवलंबून असतात. केंद्रीय पातळीवरील निवडणुका व प्रादेशिक पातळीवरील निवडणुकांचा कौल वेगवेगळा असतो. याचा अर्थ मतदारांत संभ्रम आहे, असा नाही तर प्रत्येक ठिकाणच्या वेगवेगळ्या परिस्थितीची आणि त्याठिकाणी आवश्यक असणाऱ्या नेतृत्वाबद्दल त्याच्या अपेक्षांची, आशाआकांक्षांची त्यांना जाणीव आहे. हेच यातून अधोरेखित होते. त्यामुळेच भारताला जगातील सर्वात मोठी लोकशाही मानले जाते. मतदार जागरूक असून वेळोवेळी योग्य त्या पक्षाला त्यांनी पाठिंबा दिल्याचे दिसून येते.''

प्रा. वासंती रासम म्हणाल्या, 'भारताच्या राजकारणाचे स्वरूप झपाट्याने बदलत असल्यामुळे पहिल्यांदा मतदान करणाऱ्या युवकांची संख्या वाढत आहे. निवडणुकांमध्ये समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून निवडणूक प्रक्रिया व्यावसायिकांकडून हाताळली जात आहेत. अशा परिस्थितीमध्ये सामाजिकशास्त्र, विधी, व्यवस्थापन शास्त्राच्या विद्यार्थ्यांना या निवडणूक प्रक्रियांमध्ये होणाऱ्या बदलांचा उपयोग आपल्या करिअरसाठी होऊ शकतो.''

दुसऱ्या सत्रामध्ये राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. प्रकाश पवार यांनी पश्चिम बंगाल, केरळ, तमिळनाडू, पुदुचेरी या चार राज्यांतील निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय सामाजीकरण, इतिहास, संस्कृती आणि बदलत्या राजकीय वातावरणासंदर्भात विश्लेषण केले. दक्षिण राज्यांमध्ये भाजप हिंदुत्ववादावर नव्हे, तर आर्थिक विकासावर भर देत असल्यामुळे बहुमत नाही मिळाले तरी मतांची टक्केवारी वाढण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

प्रा. मनीष केळकर यांनी निवडणुकांमध्ये माहिती-तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे राज्यशास्त्र व सामाजिक शास्त्रांतील विद्यार्थ्यांना या निवडणुकींच्या बदलत्या स्वरुपामुळे अनेक रोजगार संधी उपलब्ध होतील. राजकीय नेतृत्व, राजकीय विश्लेषक, राजकीय सल्लागार, प्रचार सभा संयोजक, निवडणूक कार्यक्रम आयोजक, वैयक्तिक सल्लागार, निवडणुकीचे इव्हेंट मॅनेजमेंट अशा अनेक संधी उदयोन्मुख युवकांना उपलब्ध असल्याचे सांगितले. एम.आय.टी.च्या आशीष लाल यांनी स्वागत केले. डॉ. रवींद्र भणगे यांनी आभार मानले.